2336

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण


९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३८९/प्रनिप्रा/१७ एप्रिल/२०२५/ ५३६ दिनांक : 28 APR 2025

**:: १००व्या बैठकीचे इतिवृत्त ::**

**श्री. समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से. (से.नि.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **१००व्या बैठकीचे इतिवृत्त,-**

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, २) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ३) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ४) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.हे अनुपस्थित होते. याबाबत नोंद घेण्यात आली.

तसेच १) डॉ. वाय.सी. साळे, संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व २) डॉ. रुपेश राऊत, सह संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित म्हणुन प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

**विषय क्रमांक १ :** **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उच्च शिक्षण व कृषी शिक्षण शिक्षण विभागा अंतर्गत व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उच्च शिक्षण व कृषी शिक्षण विभागा अंतर्गत व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. मधील निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक २ : मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अभ्यासक्रम-निहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर. (संदर्भ:- प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ (बाब क्रमांक ५) व दिनांक २०/०१/२०२५ (बाब क्रमांक ९) रोजींच्या बैठकीतील निर्देश).**

विषयांकित प्रकरणी प्राधिकरणाच्या निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी / छाननी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अभ्यासक्रम/महाविद्यालय/विद्यार्थी -निहाय प्रकरणांचा तपशील सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी सादर केला. सदरील अहवालाचे अवलोकन करुन प्रकरण निहाय सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी संचालनालयाचे फेर तपासणी / छाननी अहवालास अनुसरुन तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी पूर्तता करण्यात आली आहे, अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली (प्रपत्र-अ). या प्रपत्रातील ज्या महाविद्यालयाकडून संबंधित प्रवेश प्रकरणी गैरप्रकार/निष्काळजीपणा झाले असल्याचे निदर्शनास आले, अशा महाविद्यालयांवर यादीतील त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार अधिनियम २०१५ मधील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करुन प्रवेशास मान्यता देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

“प्रपत्र-अ” मधील महाविद्यालयांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या दंडाची रक्कम "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००0३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे १५ दिवसांत भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**विषय क्रमांक ३: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ए.सी.पी.एम. चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. (Discrepancy - Candidate was not registered with State CET Cell).**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास संस्था स्तरावरील रिक्त जागांकरिता सीईटी कक्षाकडे नोंदणीकृत असलेल्या व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतून संस्था स्तरावरील रिक्त जागांकरिता इच्छूक उमेदवारांचे अर्ज बोलावुन नीट-पीजी-२०२२ च्या गुणवत्तेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यास सर्व व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांना सीईटी कक्षाद्वारे परवानगी देण्यात आली होती.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

या अनुषंगाने ए.सी.पी.एम. वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास १५% संस्थात्मक कोटयातील रिक्त जागेकरिता डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांना प्रवेश दिला, परंतू डॉ कुलकर्णी यांनी प्रवेशाकरिता आवश्यक असलेल्या विहित नियमावलीनुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता नोंदणी प्रक्रिया पुर्ण केली नव्हती. त्यामुळे त्यांचा नीट-पीजी-२०२२ च्या राज्य गुणवत्ता यादीमध्ये (State Merit List) समावेश नव्हता.

डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश प्रकरणी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक २१/०३/२०२३ रोजीच्या अहवालामध्ये खालील प्रमाणे त्रुटी दर्शविली होती,-

> "College has admitted one candidate (AIR 121681 - Kulkarni Shiram Raghvendra) during Institution level round in 15% quota. This candidate is not registered with the State CET Cell. Therefore, the admission of this candidate is subject to approval of ARA."

डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयाने सादर केलेल्या पुनर्विलोकन अर्जास अनुसरुन दिनांक ७/११/२०२३ रोजी तत्कालीन मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर सुनावणी घेण्यात आली व तद्नुषंगाने दिनांक ०६/१२/२०२३ रोजीच्या निर्णयान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण / योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका फेटाळण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक ६/१२/२०२३ रोजीच्या निर्णयास अनुसरुन संबंधित महाविद्यालयाने दिनांक ३/०१/२०२४ रोजीच्या ईमेल व २/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेशास मान्यता मिळण्याबाबत पुन्हा विनंती केली.

या संदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ व ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीत पुन:श्च प्रवेश पडताळणी करिता दिलेल्या निर्देशानुसार संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना पुन:श्च पडताळणीकरिता दिनांक ६/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार संचालनालयाने दिनांक ११/०६/२०२४ रोजीच्या अहवालामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे,-

| Sr. No. | Name of the College & College Code | DMER Re-verification Reports submitted to ARA | Eligibility |
|---|---|---|---|
| 1. | 1120 : JMF's ACPM Medical College, Dhule | Candidate was not registered with State CET Cell. Hence as per NEET-PG-2022 Information Brochure, the candidate is NOT Eligible for admission. | Not Eligible |

प्रस्तूत प्रकरणी नमूद वस्तूस्थिती विचारात घेता ए.सी.पी.एम. चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश प्रकरणी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक २१/०३/२०२३ व ११/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या उक्त अहवालानुसार संबंधित विद्यार्थी प्रवेशास अपात्र ठरत असल्याची बाब स्पष्ट आहे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिक[illegible]
महाराष्ट्र राज्य

सद्यस्थितीमध्ये महाविद्यालयाने दिनांक १२/१२/२०२४ रोजीच्या ईमेलसह यापूर्वी सादर केलेली कागदपत्रे पुनश्च तपासणी/छाननी करुन तसेच डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेशास त्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन प्राधिकरणाची मान्यता मिळण्याची विनंती केली आहे.

वरील बाबी विचारात घेता प्रवेश नियमावलीमध्ये तरतूद नसताना तसेच डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसताना, कोणत्या नियमांच्या आधारे ए.सी.पी.एम.चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांनी सदरील प्रवेश केला, याबाबतचा वस्तूस्थितीदर्शक अहवाल महाविद्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले.

सदरील अहवाल प्राप्त झाल्यावर सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी तपासणी / छाननी करुन त्यांचे अभिप्राय प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता पुढील बैठकीत सादर करावे.

<u>विषय क्रमांक ४</u> : <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, ठाणे सब कॅम्पस, स्कुल ऑफ लॉ, ठाणे या महाविद्यालयात एल.एल.बी ५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीमध्ये कु. खुशी सुजय सरकार या विद्यार्थिनीचे नाव समाविष्ट करुन प्रवेशास मान्यतेबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उच्च शिक्षण व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची संपूर्ण माहिती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई (कॅप प्रक्रियेच्या सेवापुरवठादार यांचे कडून) यांच्यामार्फत उच्च शिक्षण प्रवेशाची संपुर्ण माहिती घेऊन संचालकांना ऑनलाईन पडताळणीसाठी देण्यात आली होती. सदर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीमध्ये कु. खुशी सुजय सरकार यांच्या नावाचा समावेश नव्हता, म्हणुन युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, ठाणे सब कॅम्पस, स्कुल ऑफ लॉ, ठाणे या महाविद्यालयाने कु. खुशी सुजय सरकार या विद्यार्थीनीचे नाव समाविष्ठ करण्याची विनंती केली.

कु. खुशी सुजय सरकार या विद्यार्थिनीने प्रवेशाला नोंदणी केल्यापासून ते प्रवेशापर्यंतची संपुर्ण माहिती परिक्षा समन्वयक, उच्च शिक्षण, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडुन दिनांक ०७/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त करुन घेण्यात आली. याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

"अनिवासी भारतीय उमेदवारांच्या वाटपात बदल होत असल्याने काही महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारांचे वाटप यातही बदल झालेला असुन काही महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार पुन्हा तेच महाविद्यालय किंवा दुसरे नवीन महाविद्यालय वाटप करण्यात आले. कोणताही विलंब न लावता पुन्हा नव्याने तिसऱ्या फेरीचे वाटप दिनांक २३/०८/२०२४ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले.

परंतु मधल्या २० ते २५ मिनिटांच्या काळात काही उमेदवारांनी "तात्पुरते जागा वाटप पत्र" (PROVISIONAL ALLOTMENT LETTER) त्यांच्या लॉगीनमधुन काढुन महाविद्यालयात प्रवेशासाठी जावुन प्रवेश निश्चित केला होता. त्या मध्ये कु.खुशी सुजय सरकार हि विद्यार्थीनी आहे. सदर विद्यार्थीनीस दिनांक २३/०८/२०२४ रोजी ३.३० दुपारी प्रवेश निश्चित केल्यावर प्रवेश निश्चिती पावती मिळालेली होती. त्यामुळे तात्काळ तिसऱ्याफेरीतील असे प्रवेश संगणकीय पध्दतीने महाविद्यालयाच्या लॉगीन मधुन रद्द करण्यात आले होते. त्या बाबतीत उमेदवारांना SMS/E-MAIL द्वारे कळविण्यात आले होते.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

कु.खुशी सुजय सरकार या विद्यार्थीनीस तिसऱ्या फेरीत पुन्हा University Of Mumbai, Thane Sub Campus, School Of Law (College Code : २४०३४२०९१२) हे महाविद्यायल वाटप करण्यात आले. कु.खुशी सुजय सरकार या विद्यार्थीनीने महाविद्यालयात जाऊन पुन्हा प्रवेश निश्चित करणे आवश्यक होते. तसेच महाविद्यालयास उमेदवाराचा प्रवेश महाविद्यालयाच्या लॉगीन मधुन पुन्हा निश्चित करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी प्रवेश निश्चित केलेला दिसत नाही. प्रत्येक फेरीचे झालेले उमेदवारांचे प्रवेश महाविद्यालय त्यांच्या लॉगीन मधुन तपासणी करणे आवश्यक आहे. सदर उमेदवाराचा प्रवेश महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये का दिसत नाही हे तपासण्याची जबाबदारी महाविद्यालयाची होती. महाविद्यालयाने प्रवेश प्रक्रियेत दुर्लक्ष केल्याचे दिसुन येत आहे. महाविद्यालयाने सदर बाब संस्थांतर्गत प्रवेश फेरी (चौथी फेरी) पूर्वी तात्काळ राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचे निदर्शनास आणून देणे आवश्यक होते."

सबब उक्त नमूद वस्तूस्थिती व कु. खुशी संजय सरकार यांचे शैक्षणिक हित विचारात घेता आणि राज्य सामईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांच्या उपरोक्त अहवालानुसार कु. खुशी सुजय सरकार यांच्या प्रवेशाची रितसर नोंदणी करण्यास व प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून निष्काळजीपणा झाला असल्याची बाब स्पष्ट आहे व सदरील बाब गंभीर स्वरुपाची असून या संदर्भात महाविद्यालयाने त्यांचा स्वयंस्पष्ट खुलासा प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.

**विषय क्रमांक ५ : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सन्मती इंजिनियरींग कॉलेज, वाशिम या महाविद्यालयातील प्रवेशित ०२ विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रवर्ग (Category) OBC ऐवजी OPEN अशी दुरुस्ती करुन देण्याबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सन्मती इंजिनियरींग कॉलेज, वाशिम येथील थेट व्दितीय वर्षात स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत प्रवेशित ०२ राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांचा प्रवेश गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गात झालेला आहे. परंतू प्रवेशावेळी सदर विद्यार्थ्यांकडे राखीव प्रवर्गाची कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाचे The Activities and scheduled for DSE - Academic Year २०२२-२३ मधील Important Instructions मधील मुद्दा क्र. ६ नुसार सदर विद्यार्थ्यांचा प्रवर्ग Auto Convert होऊन खुला प्रवर्ग झालेला आहे.

त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या मान्यता पत्रात सदर विद्यार्थ्यांचा राखीव प्रवर्ग OBC नमुद असुन तो OPEN असा बदल करुन मिळण्याच्या महाविद्यालयाच्या विनंतीच्या अनुषंगाने, खालील प्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात आली,-

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| Sr. no. | Student name | Branch | Merit List No. | Category | Seat Type |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Ku. Yogesh Sunil Shelke | Civil Engineering | 05 | OPEN | GOPEN |
| 2 | Ku. Yashwant Purushottam Bhagat | Civil Engineering | 16 | OPEN | GOPEN |

सदर विद्यार्थ्यांचा प्रवर्ग Auto convert होऊन खुला प्रवर्गात झालेला असताना सुध्दा प्राधिकरणाच्या मान्यता पत्रात ओ.बी.सी. प्रवर्ग असा नमूद करण्यात आल्याबाबत सविस्तर खुलासा सेवापुरवठार यांच्याकडून घेऊन आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी प्राधिकरणास सादर करवा.

प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात यावा.

<u>विषय क्रमांक ६</u> : <u>शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर PH२५७७ या महाविद्यालयात प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित **कु**. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली या विद्यार्थिनीने प्रवेश मान्यतेकरिता **Restoration Application: U/O - 9 Rule - 4 of Civil Procedure Code, 1908** सादर केले आहे.</u>

(१) <u>(संदर्भ - मे. सर्वोच्च न्यायालयाचे Suo Motu Writ Petition (C) No. 3 of २०२० मधील निर्देश.)</u>

(२) <u>(संदर्भ:- प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(ड) व दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(घ) मधील निर्देश).</u>

दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली यांच्या पालकांनी दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या Restoration Application: U/O - ९ Rule - ४ of Civil Procedure Code, १९०८ या विषयाच्या अर्जान्वये खालीलप्रमाणे प्राधिकरणास विनंती केली आहे.

"१. मे. सर्वोच्च न्यायालयाचे Suo Motu Writ Petition (C) No. ३ of २०२० मधील निर्देशाचे अवलोकन करुन पुनर्विलोकन अर्जावर मे. न्यायकार्यासनाने दि.२२/०६/२०२२ रोजी दिलेले आदेश रद्दबातल करण्यात यावेत.

२. मे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, न्यायाचे मुळ तत्व, नैसर्गिक न्यायतत्त्व, Aggrieved Party, inclusion of necessary party to the proceeding, अर्जदाराने जाणीवपुर्वक कोणताही विलंब केलेला नसल्यामूळे, अपरिहार्य अडचणीमुळे मे. जात पडताळणी समितीने विलंबाने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र, सादर करण्याकरीता केवळ २३ दिवसांचा झालेला विलंब माफ करावा व अर्जदाराचा अर्ज मंजूर करून नियमित प्रवेशास मान्यता देण्यात यावी."

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

अर्जदाराने अर्जात उल्लेख केलेल्या Suo motu Writ Petition (c) No.३ of २०२० प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयाचे अवलोकन करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित सदर विद्यार्थिनी OBC या राखीव प्रवर्गाची असली तरी तिचा प्रवेश Seat Type - ACAP मधून झालेला आहे. तसेच, सदर विद्यार्थिनीस दि.०८/१०/२०२१ रोजीचे OBC जातीचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. परंतू, सदर प्रमाणपत्र प्रवेश बंद दिनांकानंतरचे आहे.

सदर विद्यार्थिनीचा प्रवेश ACAP कोटयातुन झालेला आहे, तसेच सदर विद्यार्थिनी खुल्या (OPEN) प्रवर्गाच्या प्रवेशास पात्र (पात्रता गुण - ४८.६६) आहे. प्रवेश नियमावली नुसार ACAP प्रवेशास आरक्षणाच्या कोणत्याही सवलती मिळत नाहीत. सदर विद्यार्थिनीने दिनांक ८/१०/२०२१ रोजीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे तसेच, त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या Suo motu Writ Petition (c)No.3of २०२० प्रकरणी दिनांक ८/०३/२०२० रोजीचे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशान्वये कोविड-१९ ची स्थिती लक्षात घेता सदर विद्यार्थिनीच्या ACAP कोटयातुन प्रवेश प्रकरणी संचालनालय, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेणे क्रमप्राप्त ठरते.

सबब प्रस्तूत प्रकरणी संचालनालय, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी तपासणी करुन सदरील प्रकरण प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ७ : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये झील एज्युकेशन सोसायटी, झील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, नऱ्हे, पुणे (MB६१९५) या महाविद्यालयात एमबीए अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दिव्या झिलु वरक या विद्यार्थिनीच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

झिल इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्पुटर ॲप्लिकेशन, पुणे या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष एमबीए या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थीनींच्या प्रवेशाबाबत महाविद्यालयाच्या दिनांक १२/१२/२०२४ रोजीच्या पत्रास अनुसरुन सादर.

झिल इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्पुटर ॲप्लिकेशन, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष एमबीए या अभ्यासक्रमास गुणपत्रक/स्थलांतर प्रमाणपत्राची त्रुटी असलेल्या कु. दिव्या झिलू वरक व कु. नम्रता लक्ष्मण कांबळे या विद्यार्थीनींच्या प्रवेश मान्यतेबाबत दिनांक २२/०५/२०२४ रोजी पुनर्विलोकन याचिका दाखल केली होती.

त्याअनुषंगाने, सदर प्रकरणी संबंधीत महाविद्यालयास दिनांक १२/०६/२०२४ रोजी सुनावणी देण्यात आलेली होती. तसेच सदर सुनावणीचे दिनांक ०१/०७/२०२४ रोजीच्या आदेशान्वये सदर याचिका फेटाळण्यात आली होती. त्यास अनुसरुन महाविद्यालयाने त्यांच्या दिनांक १९/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधित विद्यार्थ्यांच्या त्रुटी बाबतचे कागदपत्रे सादर केली असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता सदर प्रवेशास मान्यता देण्याबाबत विनंती केली आहे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

महाविद्यालयाने सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

| Sr. No. | College Name | Academic Year | Course | Candidate name | Discrepancy | सादर करण्यात आलेले कागदपत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6195 : Zeal Institute of Management and computer application pune | 2023-24 | MBA | Divya Zilu Varak- | Graduation Certificate | Sem – VI Marksheet submitted |
| | | | | Namrata Laxman Kamble | Migration pending/GAP/ Leaving Certificate | Transference Certificate |

उक्त तालिकेनुसार या महाविद्यालयांकडून कु. दिव्या वरक यांनी पदवी प्रमाणपत्र व कु. नम्रता कांबळे यांचे स्थलांतर प्रमाणपत्र सादर केले असल्याने कागदपत्रांची पुर्तता झाली असल्याची बाब स्पष्ट आहे.

उक्त नमूद बाबी व प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता झिल इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्पुटर ॲप्लिकेशन, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष एमबीए या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दिव्या वरक व कु. नम्रता कांबळे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली.

**<u>विषय क्रमांक ८</u> : <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कृषि अभ्यासक्रमास कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर, सोनई नेवासा, अहमदनगर येथील प्रवेशित कु. सार्थक राजु नरोडे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>**

मुळा एज्युकेशन सोसायटीचे कृषि महाविद्यालय, सोनई, जिल्हा अहमदनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कृषी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. सार्थक राजु नरोडे यांच्या प्रवेशा संदर्भात संचालनालय, कृषि शिक्षण व संशोधन, परिषद, पुणे यांनी दिनांक १५/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केला होता,-

> "..... वरील बाबी विचारात घेता कु. सार्थक राजु नरोडे या विद्यार्थ्याचे जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नसल्याने सदर विद्यार्थ्यांचा प्रवेश नाकारण्यात यावा, असे अभिप्राय सादर करण्यात येत आहेत"

उक्त अहवालास अनुसरुन सदरील प्रवेशास प्राधिकरणाच्या दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ३(क)(३२) अन्वये प्राधिकरणाने मान्यता नाकारण्यात आली. प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांस प्राधिकरणाच्या दिनांक २६/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेला आहे. प्राधिकरणाचा निर्णय खालील प्रमाणे आहे,-

> "..... संचालनालयाचे उक्त अभिप्राय विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कृषी अभ्यासक्रमास कु. सार्थक राजु नरोडे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत आहे."

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्राधिकरणाच्या उक्त निर्णयास अनुसरुन मुळा एज्युकेशन सोसायटीचे कृषि महाविद्यालय, सोनई, जिल्हा अहमदनगर यांनी दिनांक ३/१०/२०२४ व ९/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदरील प्रवेश प्रकरणी कु. सार्थक राजु नरोडे यांना मान. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांच्या दिनांक २८/०६/२०२३ रोजीच्या निर्णयान्वये विद्यार्थी दुसऱ्या सत्रात शिकत असल्याचे तसेच विद्यार्थ्याच्या जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर, संबंधित संचालनालय व प्राधिकरणास सादर केले असल्याचे तसेच सदरील जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेत सादर केले असल्याचे सदरील पत्रामध्ये नमूद केले आहे.

उक्त वस्तूस्थितीनुसार महाविद्यालयांकडून कु. सार्थक राजु नरोडे यांच्या प्रवेश प्रकरणी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले असल्याने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाली असल्याची बाब स्पष्ट आहे.

या अनुषंगाने उक्त नमूद बाबी व प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता मुळा एज्युकेशन सोसायटीचे कृषि महाविद्यालय, सोनई, जिल्हा अहमदनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कृषी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. सार्थक राजु नरोडे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली.

<u>विषय क्रमांक ९</u> : <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत प्राप्त झालेल्या व तत्कालीन मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर अमान्य झालेल्या पुनर्विलोकन याचिका प्रकरणी संबंधित महाविद्यालये व विद्यार्थी यांनी सादर केलेल्या समर्पक कागदपत्रांच्या अनुषंगाने पुनश्च शहानिशा/तपासणी करुन पात्रतेबाबतचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याच्या निर्देशांकरिता. "(प्रपत्र – ब)"</u>

आणि

<u>विषय क्रमांक १०</u> : <u>माहे ऑगस्ट २०२४ नंतर प्राप्त झालेल्या पुनर्विलोकन याचिकांमध्ये प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २० जानेवारी २०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ११ मधील निर्देशांनुसार प्रवेश मान्यतेच्या याचिका प्रकरणी पडताळणी करुन पात्रतेबाबतचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याच्या निर्देशांकरिता. "(प्रपत्र – क)"</u>

आणि

<u>विषय क्रमांक ११</u> : <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतच्या विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी नव्याने प्राप्त झालेल्या पुनर्विलोकन याचिकांप्रकरणी पडताळणी करुन पात्रतेबाबतचा अहवाल प्राधिकरणा समोर मान्यतेसाठी सादर करण्याच्या निर्देशांकरिता (दिनांक : ३१/०३/२०२५ रोजी पर्यंत प्राप्त झालेले पुनर्विलोकन याचिका) "(प्रपत्र – ड)"</u>

अध्यक्ष
...नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतच्या विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित संचालकांनी अथवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार गठित करण्यात आलेल्या उपसमितीच्या अहवालामध्ये दर्शविलेल्या त्रुटींमुळे अमान्य प्रवेश प्रकरणी पुनर्विलोकन याचिका सादर करण्यात आल्या होत्या. सदर याचिका प्रकरणी तत्कालीन मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी परिपूर्ण कागदपत्रांअभावी पुनर्विलोकन याचिका अमान्य करण्यात आल्या होत्या. सदर याचिका प्रकरणी महाविद्यालय / विद्यार्थी यांच्याकडून पुनश्च कागदपत्रांसह प्रवेश मान्य करण्यासाठी विनंती अर्ज सादर करण्यात आले आहेत. सदर पुनर्विलोकन याचिका अमान्य केलेल्या व प्रवेशांना मान्यता न झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील/आकडेवारी प्राधिकरणाच्या बैठकीत प्रपत्र-ब, प्रपत्र-क व प्रपत्र-ड नुसार सादर करण्यात आलेली असुन तद्नुषंगाने प्रस्तूत प्रकरणी सांगोपांग चर्चा करण्यात आली.

या संदर्भात नमूद त्रुटींबाबत बहुतांशी महाविद्यालयांनी त्रुटींच्या पूर्ततेबाबत आवश्यक कागदपत्रे प्राधिकरणास सादर केली असल्याची बाब प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. परंतू याबाबत तपासणी / छाननी होऊन प्राधिकरण स्तरावर निर्णय होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयांकडून सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने सदरील त्रुटींची तपासणी / छाननी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर करुन त्याचा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत त्यासाठी खालील प्रमाणे मागदर्शक तत्वांचा वापर करण्याचे निर्देश दिले,-

(अ) संबंधित संचालक अथवा उपसमितीने दर्शविलेल्या त्रुटींचे अवलोकन करुन नस्ती तपासणे,

(आ) उपरोक्त कामकाज शैक्षणिक वर्ष /अभ्यासक्रम निहाय प्राधान्यक्रम ठरवून सादर करणे.

(इ) सदरील त्रुटींस अनुसरुन महाविद्यालयांनी सादर केलेला समर्पक खुलासा व कागदपत्रे / प्रमाणपत्रांची तपासणी / छाननी करणे,

(ई) संबंधित प्रवेश प्रकरणी प्राप्त कागदपत्रांनुसार त्रुटींची पूर्तता पूर्ण होऊन विहित केलेल्या नियमांनुसार विद्यार्थी प्रवेशास पात्र /अपात्रतेबाबत खातरजमा करणे,

(उ) ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटींची पूर्तता सादर केली नसल्याचे अथवा अपूर्ण माहिती सादर केली असल्याचे निदर्शनास आल्यास, तसा अहवाल सादर करणे,

(ऊ) प्राप्त माहिती / कागदपत्रांच्या आधारे पात्र / अपात्र विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्ष / अभ्यासक्रम / महाविद्यालय / विद्यार्थी निहाय अहवाल सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी मा. प्राधिकरणाच्या बैठकीत उचित निर्णयाकरिता सादर करणे,

(ऋ) ज्या प्रवेशांबाबत विद्यार्थी राखीव प्रवर्गानुसार पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसेल परंतू प्रवेशित सवंर्ग / प्रवर्गानुसार विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरत असल्यास, योग्य त्या शिफारशीसह अहवाल प्रवेश मान्यतेकरिता प्राधिकरणास सादर करणे,

(ऌ) ज्या प्रवेश प्रकरणी विद्यार्थी प्रवेशित संवर्ग / प्रवर्गानुसार पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसल्यास, संबंधीत प्रकरणे प्राधिकरण स्तरावर अंतिम निर्णय पारीत करुन निकाली काढण्यासाठी कारणांसह सादर करणे.

उपरोक्त प्रमाणे सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्राधान्य क्रमाने छाननी / पडताळणी / तपासणी करुन त्याचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी तीन महिन्यांच्या आत सादर करवा, असे निर्देश देण्यात आले.

**<u>विषय क्रमांक १२ :</u> <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश मान्यता प्रस्ताव विहीत कालावधीत सादर न केल्यामुळे अधिनियम, २०१५ मधील कलम २० मधील तरतुदींनुसार शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत लेखी समर्पक खुलासा सादर करणेबाबत कारणे दाखवा नोटीस निर्गमित केलेल्या केलेल्या महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रवेश मान्यता प्रस्तावांबाबत.</u>**

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश मान्यता प्रस्ताव विहित कालावधीत सादर न केलेल्या महाविद्यालयाबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्राधिकरणास वस्तूस्थिती अवगत केली, व त्या अनुषंगाने खालील प्रमाणे सांगोपांग चर्चा करण्यात आली.

283



शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रवेश मान्यता प्रक्रिये दरम्यान विहीत कालावधीत प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर न केल्यामुळे अधिनियम, २०१५ मधील तरतुदींचे महाविद्यालयांनी प्रथम दर्शनी उल्लंघन केल्याचे दिसून येते. त्यानुसार अशी एकुण २९ महाविद्यालयांपैकी (३०३३) बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड यांची ५ अभ्यासक्रमांची महाविद्यालये वगळून (एकुण २९-५ = २४ महाविद्यालये) २४ महाविद्यालये आहेत.

सदरील २४ महाविद्यालयांपैकी MB ३००१ जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई या एमबीए अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिनियम, २०१५ मधील तरतुदीं लागु करण्यात येऊ नयेत असे प्राधिकरणांस सादर केलेले आहे. याबाबत विषय क्रमांक १३ मध्ये निर्णयासाठी सादर करण्यात आला आहे.

उक्त नमूद ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव विहीत कालावधीत सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयांना दिनांक २५/०४/२०२४, ०४/०३/२०२४ व ५/११/२०२४ रोजींच्या पत्राने वारंवार कळविण्यात आलेले आहे. अधिनियमातील तरतुदींनुसार कारणे दाखवा नोटिस देण्यात आलेल्या आहेत.

त्यापैकी ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्तावासोबत खुलासा सादर केलेला आहे अशा महाविद्यालयांचे प्रस्ताव खुलाशांसह प्राधिकरणासमोर मान्यतेस सादर करण्यात आलेले आहेत.

वरील बाबी विचारात घेता ज्या महाविद्यालयांचे प्रवेश मान्यता प्रस्तावासोबत खुलासा प्राप्त झालेले आहेत, अशा महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना संबंधित संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे **(प्रपत्र-इ)**.

परंतू, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या या निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास प्रत्येकी रुपये एक लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे १५ दिवसांच्या आत भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

तसेच, ज्या महाविद्यालयांनी अद्याप प्रस्ताव तसेच खुलासा सादर केलेला नाही **(प्रपत्र-फ)** अशा महाविद्यालयांना प्रस्ताव सादर न केल्यास पुढील शैक्षणिक वर्षासाठी त्यांचे संलग्नीकरण रद्द करण्याबाबत संबंधीत प्राधिकरणांस शिफारस करण्यात येईल याबाबतचे दिनांक ४/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत महाविद्यालयांना कळविण्यात आले होते. तरी सुध्दा अशा महाविद्यायांनी दिनांक १६/०४/२०२५ पर्यंत प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेला नाही. ही बाब गंभीर आहे. अधिनियमातील तरतूदींनुसार संबंधित विद्यापीठास संलग्निकरण रद्द करण्याबाबत शिफारस करण्याचे निर्देश देण्यात आले.

अध्यक्ष
नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १३ : जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील "प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव" प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक नसलेबाबत.**

जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई (MB३००१) या महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी पाठविण्याबाबतची अधिनियम, २०१५ मधील तरतुद असंबंधीत असल्याचे कळविले होते, याबाबत तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ३०/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केले आहेत.

> "जमनालाल बजाज इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई यांनी (MB३००१) दि.१८.११.२०२४ च्या पत्रान्वये कळविलेली बाब योग्य आहे. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३/१६/तांशि-४,दि.२५.०४.२०१७ अन्वये शासकीय/ अशासकीय अनुदानित व विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचलित संस्थेतील प्रवेश हे सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यात येतात. त्यानूसार सदर संस्थेतील मंजूर प्रवेश क्षमतेचे सर्व प्रवेश केंद्रीभूत् प्रवेश प्रक्रियेमार्फत करण्यात येतात. ही संस्था मुंबई विद्यापीठाची स्वायत्त संस्था असल्याने या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसल्याची संस्थेची धारणा योग्य आहे."

सबब, संचालनालयाच्या अभिप्रायानुसार जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई (MB३००१) ही संस्था मुंबई विद्यापीठाची स्वायत्त संस्था असल्याने या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. यापुर्वीची या महाविद्यालयाच्या प्राधिकरणाच्या मान्यतेची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक वर्ष | प्रक्रिया शुल्क | प्राधिकरणाची मान्यता |
|---|---|---|---|
| १. | २०१८-१९ | रु.४६२८०+१८५१२ Penalty amt. = ६४,७९२/- भरणा केलेला नाही. | मान्यता देण्यात आलेली आहे. |
| २. | २०१९-२० | रु.३८,०००/- भरणा केलेला नाही. | मान्यता देण्यात आलेली आहे. |
| ३. | २०२०-२१ | रु. २०,०००/- भरणा केलेला नाही. | महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केला नाही सबब प्राधिकरणाची मान्यता देण्यात आलेली नाही. |
| ४. | २०२१-२२ | रु. २/- भरणा केलेला आहे. | महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केला नाही सबब प्राधिकरणाची मान्यता देण्यात आलेली नाही. |
| ५. | २०२२-२३ | रु. २०,०००/- भरणा केलेला आहे. | महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केला नाही सबब प्राधिकरणाची मान्यता देण्यात आलेली नाही. |
| ६. | २०२३-२४ | रु.२३,०००/- (ऑनलाईन/ऑफलाईन) असे दोन वेळा एकुण रु.४६,०००/- भरणा केलेला आहे. | महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केला नाही सबब प्राधिकरणाची मान्यता देण्यात आलेली नाही. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

२८५/-

जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील एमबीए अभ्यासक्रमाचा प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर केलेला नाही, परंतू, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रवेश मान्यतेकरिता आकारण्यात येणारे प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला आहे. या महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे राबविण्यात येते.

त्यानुसार, जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई ही संस्था संचालनालयाच्या अभिप्रायानुसार मुंबई विद्यापीठाची स्वायत्त संस्था असल्याने सदर संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता घेण्याची आवश्यकता असल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट आहे. परंतू तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ३०/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला अहवालातील बाबी कोणत्या कायद्यास / शासन निर्णयास अनुसरुन आहेत अथवा कोणत्या नियमा अंतर्गत सदरील महाविद्यालया शुल्क अदा करण्यास सवलती देता येईल, याबाबतचा अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयाने प्राधिकरणास १५ दिवसांत सादर करावा. तद्नंतर प्रस्तूत प्रकरणी पुढील निर्णय घेण्यात यईल.

या संदर्भात संचालनालयाचा अहवाल प्राप्त होई पर्यंत व तद्नुषंगाने प्राधिकरणाचा अंतिम निर्णय होई पर्यंत जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश मान्यते प्रकरणी प्रक्रिया शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहील, याबाबत नोंद घेऊन सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी याबाबत उचित कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक १४ : मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि.))
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.

दिनांक :